**प्रेस नोट दिनांक ११/०६/२०१९**

**सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे शहर.**

**हरविलेल्या ४ वर्षाच्या मुलीचा शोध घेवुन त्यांचे आईचे ताब्यात दिले.**

दिनांक ८/०६/२०१९ रोजी रात्रौ २०.०० वा चे सुमारास ज्योती भिमा कांबळे रा. चैतन्यनगर, धनकवडी, पुणे या मुलीस शाहु बॅंक चौक, एस डी एफ सी बॅंक, ए टी एम, धनकवडी, पुणे येथे एक लहान मुलगी वय ३-४ वर्षे हि रडत असताना मिळुन आली. सदर मुलीस तिने सहकारनगर पोलीस ठाणे येथे आणले. त्या लहान मुलीस तिचे नाव देखिल सांगता येत नव्हते. सदर मुलीचा फोटो पोलीस ठाणे ग्रुपवर तसेच इतर पोलीस ठाणे ग्रुपवर टाकुन तिचे आई वडीलांचा काही नाव पत्ता मिळतो का ? तसेच इतर पोलीस ठाणेस तिचेबाबत मिसींग दाखल आहे का ? याबाबत तपास चालु होता.

सदर मुलीचे आई वडील देखिल मुलीचा शोध घेत होते. ते शोध घेत सहकारनगर पोलीस ठाणेस मुलीचे मिसींगबाबत तक्रार देणेस आले. मपोना.खंडागळे यांनी त्या मुलीचे आईस सदर मुलीस दाखविले असता त्यांनी सदरची मुलगी त्यांचीच असल्याचे सांगितलेने सदरची लहान मुलगी नामे पवित्रा बेबीराम भंडारी वय ३ वर्षे हिस तिची आई नामे नमिता बेबीराम भंडारी वय २५ वर्षे रा. धनकवडी, पुणे मो.नं. ९१५६७४६९१३ हिचे ताब्यात सुखरुप देण्यात आले. सदरबाबत मुलीचे आई-वडीलांनी पोलीसांचे आभार मानले.

(अनिल शेवाळे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सहकारनगर पोलीस स्टेशन,पुणे शहर